# तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद

(ISO 9001:2008 प्रमाणित)

पत्र पेटी क्र -५१६ औरंगाबाद - ४३१ ००५

(०२४०)२३३४२१६(P) २३३४७६९(O) Fax-२३५६८२०

http://www.dteau.org Email- roaurangabad@dtemaharashtra.gov.in


जा.क्र.विकाऔ/शिक्षण/२०१९/ १०२८

दिनांक : 27 MAR 2019

प्रति,

**सर्व प्राचार्य/संचालक,**

शासकीय/अनुदानित व विना अनुदानित व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या संस्था,

औरंगाबाद विभाग.

विषय : **शैक्षणिक वर्ष २०१९-२० करीता व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेशाकरीता नोंदणी प्रक्रियेबाबत.**

संदर्भ : ०१. सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई यांचे पत्र क्र. तंशिप्र-१२१९/प्र.क्र.५७/प्रनिप्रा/१८२, दिनांक ०५-०३-२०१९

०२. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र. २अ/एडीएम/२०१९/२१२, दिनांक १४ मार्च २०१९

उपरोक्त संदर्भ क्र. २ पत्रात नमुद केल्यानुसार शैक्षणिक वर्ष २०१९-२० साठीचे राज्यातील व्यावसायिक अभ्यासक्रमांचे शासकीय/शासन अनुदानित/महापालिका/अल्पसंख्यांक/खाजगी विनाअनुदानित महाविद्यालयांतील प्रवेश राज्य समाईक प्रवेश परीक्षा कक्षामार्फत करण्यात येत आहेत. त्याकरीता सर्व मान्यता प्राप्त संस्थांनी प्राधिकरणाच्या अधिकृत संकेतस्थळावर त्यांनी वेळोवेळी देण्यात येणा-या सुचनांनुसार नोंदणी करणे आवश्यक आहे. ज्या मान्यता प्राप्त संस्था आवश्यक विहित कागदपत्रांसह प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या संकेत स्थळावर नोंदणी करतील अशाच शैक्षणिक संस्थांचे शैक्षणिक वर्ष २०१९-२० साठीचे प्रवेश राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षामार्फत करण्यात येतील, याची नोंद घ्यावी.

**अधिक माहिती व आवश्यक कार्यवाहीस्तव संदर्भ क्र. २ पत्राची प्रत सोबत जोडली आहे.**

(महेश शिवणकर)

प्र.सहसंचालक,

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,औरंगाबाद

प्रत : या कार्यालयाचे प्रोग्रामर यांना संकेतस्थळावर प्रसिध्द करण्याकरीता.

# महाराष्ट्र शासन
## प्रवेश नियामक प्राधिकरण

८वा मजला, न्यू. एक्सलसियर
बिल्डींग, ए.के. नायक मार्ग,
फोर्ट, मुंबई - ४०० ००१

दुरध्वनी : ०२२ - २२०६ ४०९०
वेबसाईट : http://www.maha-ara.org
ईमेल : maharashtra.ara@gmail.com

क्रमांकः तंशिप्र-१२१९/प्र.क्र.५७/प्रनिप्रा/982 दि.५ मार्च, २०१९

प्रति,

१. संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय, मुंबई.
२. संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई.
३. संचालक, आयुष संचालनालय, मुंबई.
४. संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, पुणे
५. संचालक, कला शिक्षण संचालनालय, मुंबई.
६. संचालक, महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन, पुणे
७. कुलसचिव, पशू व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपुर

**विषय : शैक्षणिक वर्ष २०१९-२० करीता व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेशाकरिता नोंदणी प्रक्रियेबाबत...**

संदर्भ : १. महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५
२. वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, शासन निर्णय क्र. एमईडी-२०१५/प्र.क्र.३९६/१५/शि-२, दि.१६/१२/२०१५
३. उच्च व तंत्रशिक्षण विभागाचा शासननिर्णय क्र. टिईएम-२०१६/प्र.क्र. ५३६/तांशि-४, दि.१५ मार्च, २०१६

महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम २०१५ मधील तरतुदींनुसार तसेच वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, शासन निर्णय क्र. एमईडी-२०१५/प्र.क्र.३९६/१५/शि-२, दि.१६/१२/२०१५ व उच्च व तंत्रशिक्षण विभागाचा शासननिर्णय क्र. टिईएम-२०१६/प्र.क्र.५३६/तांशि-४, दि.१५ मार्च, २०१६ प्रमाणे शैक्षणिक वर्ष २०१९-२० साठीचे महाराष्ट्र राज्यातील व्यावसायिक अभ्यासक्रमांचे शासकीय/ शासन अनुदानित/ महापालिका/ अल्पसंख्यांक/खाजगी विनाअनुदानित महाविद्यालयांतील प्रवेश राज्य सामाईक प्रवेश परिक्षा कक्षामार्फत करण्यात येणार आहेत.

२. शैक्षणिक वर्ष २०१९-२० मध्ये अशा सर्व मान्यताप्राप्त संस्थांनी प्राधिकरणाच्या अधिकृत संकेतस्थळावर नोंदणी करणे आवश्यक आहे. नोंदणी करण्यासाठी आवश्यक असणाऱ्या कागदपत्रांची यादी अभ्यासक्रम निहाय या प्राधिकरणांस तात्काळ कळविण्यात यावी.

३. ज्या मान्यताप्राप्त संस्था आवश्यक विहीत कागदपत्रांसह प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या संकेतस्थळावर नोंदणी करतील अशा शैक्षणिक संस्थांचे शै. वर्ष २०१९-२० साठीचे प्रवेश राज्य सामाईक प्रवेश परिक्षा कक्षामार्फत करण्यात येतील. याबाबत आपण आपल्या स्तरावरून सर्व संबंधीत संस्थांना कळविण्यात यावे.

४. याबाबतची सर्व जबाबदारी संबंधीत संस्थांची राहील.

(आ. ए. रायते,) भा.प्र.से.
सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा
आयुक्त व सक्षम प्राधिकारी,
राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई.

प्रत माहितीकरिता अग्रेषित,-
मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.

प्रत,-
१. मा. अध्यक्ष/सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण यांचे स्वीय सहाय्यक.
२. निवडनस्ती, प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई.